71

क्र. मुंमप्रविप्रा/बैठक/४३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दिनांक : ८ एप्रिल. १९८७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या दिनांक २३ मार्च, १९८७ रोजी झालेल्या ४३व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

अ. वि. आसगांवकर
८/४/८७

( अ. वि. आसगांवकर )
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति,

सर्व सदस्य

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

No.BMRDA/MTG/43.

BOMBAY METROPOLITAN REG
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th floor, Bandra(East)
BOMBAY- 400 051.

Date : 8th April, 1987

The minutes of the 43rd meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 23rd March, 1987 are enclosed.

2. Members are requested kindly to intimate their objections, if any.

( S.V. ASGAONKAR )
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:
All Members.
The Officers of the B.M.R.D.A

------

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या त्रेचाळीसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

<u>दिनांक</u> : २३ मार्च, १९८७ (सोमवार)

<u>वेळ</u> : सकाळी ११.०० वाजता

<u>सभास्थान</u> : मा. नगर विकास मंत्री यांचे कार्यालय कक्ष, दुसरा मजला, मंत्रालय.

<u>उपस्थित सदस्य</u> :

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्हि. सुब्रमण्यन्<br>नगर विकास व गृहनिर्माण मंत्री | -- | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णू सावंत<br>नगर विकास राज्यमंत्री | -- | सदस्य |
| श्री. रमणलाल छोटालाल अंकलेश्वरीया<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्रीमती इंदुमती वि. पटेल<br>नगरसेविका, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्या |
| श्री. भगवंतराव अण्णासाहेब पाटील<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. रमेश दुबे,<br>विधानसभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू,<br>विधानसभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री. स. श. तिनईकर,<br>महानगरपालिका आयुक्त,<br>मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. दिनेश कुमार जैन,<br>शासनाचे सचिव,<br>नगर विकास विभाग, | -- | सदस्य |
| श्री. दिनेश अफझुलपूरकर,<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | -- | सदस्य |
| श्री. के. जलिंधान,<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको, | -- | सदस्य |
| श्री. एस. आर. काकोडकर,<br>महानगर आयुक्त, | -- | सदस्य-सचिव |

बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या मागील (१) दिनांक ९.९.१९८८ रोजी झालेल्या ४२ व्या व (२) दिनांक २८.१२.१९८८ रोजी झालेल्या विशेष बैठकीची कार्यवृत्ते पक्की करणे

दिनांक ९ सप्टेंबर,१९८८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ४२व्या आणि दिनांक २८ डिसेंबर,१९८८ रोजी झालेल्या विशेष बैठकीची कार्यवृत्ते पक्की करण्यात आली.

बाब क्र.२ : दिनांक ९ सप्टेंबर,१९८८ व दिनांक २८ डिसेंबर,१९८८ रोजी आयोजित अनुक्रमे ४२व्या व विशेष बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही.

वरील बाबीवर झालेल्या चर्चेनंतर प्राधिकरणाने कार्यवाही प्रतिवेदनाची नोंद घेतली.

बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'अ' ब्लॉकमधील वाणिज्य भू-खंड क्र.सी-१९ आणि सी-२१ यांची विक्री

वरील बाबीवर मा.अध्यक्षांनी असे विचार व्यक्त केले की, नियत वाटपासाठी फक्त दोन भू-खंड उपलब्ध आहेत तर ते मिळावेत म्हणून तीन संस्थांनी म्हणजे (१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, (२) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, आणि (३) महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त पुरवठा सोसायटी, यांच्या विनंतीवर विचारविमर्श करावा लागेल. दोन भू-खंडवरील जागा वर उल्लेखित तीन संस्था आपसात वाटून घेऊ शकतील का, याबाबत त्यांच्याशी आपण चर्चा करु असे अध्यक्षांनी सांगितले. संकल्पित चर्चा होईतोवर वरील बाबीवर निर्णय घेण्याचे पुढे ढकलण्यात आले.

बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'एच' ब्लॉकमधील भू-खंडाचे तेल व नैसर्गिक वायू आयोगाला नियत वाटप.

ही बाब विचारात घेण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.५ : ठाणे तालुक्यातील पाचपाखाडी येथील जमिनीचे नियत वाटप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी सहकारी गृहनिर्माण (संकल्पित) संस्थेची विनंती.

५.१ वरील बाबीवर झालेल्या चर्चेच्या वेळी शासकीय निर्णय क्र.(महसूल व वन विभाग) एलसीएस-१०८३/१.८५/सीआर-२२/जी-४, दिनांक १२.५.८३ मध्ये राज्य शासनाने, त्यानंतर १९८८ साली निर्गमित केलेल्या शासन निर्णयाव्दारे फेरफार केले असल्याचे सांगण्यात आले.

५.२ मा.अध्यक्षांच्या सूचनेनुसार संदर्भाधीन बाबीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाला प्रतिवेदन सादर करण्यासाठी (१) महानगर आयुक्त, (२) सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, आणि (३) सचिव, नगर विकास विभाग यांचा समावेश असलेली एक त्रि-सदस्य समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर करण्यात आला :-

ठराव क्र.३२७ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण, त्याला मुं.म.प्र.वि.प्रा.अधिनियम, १९७४ चे कलम ९ चे उपकलम (१) खालील प्रयोज्य शक्तींचा वापर करुन प्रस्तुत बाबीवर, त्या संदर्भात राज्य शासनाने (महसूल व वन विभाग) १९८६ साली निर्गमित केलेल्या शासन निर्णयाद्वारे विचारविमर्श करुन त्यासंबंधीचा अहवाल प्राधिकरणापुढे विचारविमर्शासाठी ठेवण्याकरिता महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आणि सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग आणि सचिव, नगर विकास विभाग हे तिचे इतर सदस्य असलेली एक समिती याद्वारे नियुक्त करीत आहे."

बाब क्र.६ : रावळी येथे निम्नस्तरीय जलाशय आणि उदंचन केंद्राचे बांधकाम करण्यासाठी वडाळा क्षेत्रातील ३.५ हेक्टर जमिनीचे मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरण

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३२८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उपकलम (२) खाली प्रयोज्य असलेल्या शक्तीआधारे वडाळा-अंनिक क्षेत्रातील ३.५ हेक्टर भू-क्षेत्राचे मुंबई महानगरपालिकेकडे, बाब टिप्पणीच्या परिच्छेद ८ मध्ये विवेचन असलेल्या नियम व अटींवर, जलाशय व उदंचन केंद्राचे बांधकाम करण्याकरिता हस्तांतरण करण्याच्या प्रस्तावास याद्वारे आपली मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हा भू-खंड मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी आणि जमिन वाटपासाठी अधिमूल्य सुचित करण्यासाठी या संदर्भात उचित कृती करण्याकरिता महानगर आयुक्त याना प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरण करावयाच्या जमिनीच्या भाडेपट्टा करारनाम्यात व भाडेपट्टी विलेख्यात अनुरुप बदल करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

बाब क्र.७ : वांद्रे-कुर्ला समूहातील जलमार्ग खोदाई प्रभारात सुधारणा करण्याबाबत.

या बाबींवर झालेल्या चर्चेत, जलमार्ग खोदाईवर झालेल्या/करावयाच्या खर्चातील वाढ लक्षात घेता वांद्रे-कुर्ला समूहातील जलमार्ग खोदाई प्रभाराच्या दरात वाढ करणे गरजेचे असले तरी जलमार्ग खोदाई प्रभारातील वाढीव खर्चाचा भार समूहातील निवासी वापरदाराऐवजी वाणिज्य वापरदारावर यथायोग्य पडेल अशा पध्दतीने तो शीर्षपारित करण्यात यावा असे सुचविण्यात आले. जलमार्ग खोदाई प्रभाराच्या विद्यमान दरात प्रति चौ.मीटरला रु.३००/- इतकी वर्धनीय सुधारणा करण्याच्या प्रस्तावाला प्राधिकरणाने तत्वतः मान्यता दिली. त्या अनुरोधाने अशा प्रभाराची स्तरीय श्रेणीनिहाय पध्दतीने आकारणी करण्याची योजना असलेला सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा अशी इच्छा प्राधिकरणाने व्यक्त केली.

बाब क्र.८ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या कर्मचारी वर्गासाठी सेवा निवासस्थान नागरी भू कमाल धारणा व नियमन) अधिनियम, १९७८ खाली शासनाकडून उपलब्ध झालेल्या आणि बोरिवली तालुक्यातील कुरार गावात स्थित तीन सदनिकांची खरेदी करण्याबाबत...

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि संदर्भाधीन सदनिकांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नावे खरेदी करुन त्याचा वापर केवळ कर्मचारी वर्गासाठी सेवा निवासस्थाने म्हणून करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३२९ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ३(२) खाली प्रदत्त आणि त्या संदर्भात सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तींचा अवलंब करुन हे प्राधिकरण बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे, शासनाकडून उपलब्ध झालेल्या आणि बोरिवली तालुक्यातील कुरार खेडयात स्थित असलेल्या तीन सदनिका रु.९५,८५०/- (रुपये पंचाण्णव हजार आठशे पन्नास) फक्त या एकूण अधिमूल्यास एकरकमी खरेदी करण्यास याव्दारे आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.९ : मुंबईचे महापौर यांचा प्रस्ताव
नगर रचनांची झळ बसलेल्या व्यक्तींना पर्यायी जागा देता यव्यात म्हणून मुंबई नागरी विकास प्रकल्पाखाली जागांचे आरक्षण करण्याबाबत.

मुंबईचे महापौर बैठकीला उपस्थित नव्हते. त्यामुळे वरील बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.१० : १९८७-८८ सालचा वार्षिक कार्ये-कार्यक्रम

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला:-

ठराव क्र.३३० :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, (अ) या टिप्पणीसह सादर केलेल्या १९८७-८८ सालचा वार्षिक कामांचा कार्यक्रम संमत करण्यात येत आहे आणि (ब) वार्षिक कार्ये-कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशीलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.११ : १९८७-८८ सालचा वार्षिक अर्थसंकल्प

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३३१ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, १९८७-८८ सालचा अर्थसंकल्प आणि १९८६-८७ सालचे सुधारीत अंदाज यातील महानगर प्राधिकरणाच्या जमा आणि व्यय रकमा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३(१) खाली मंजूर करण्यात येत आहेत.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, राज्य शासनाकडून कलम १८(१) (अ) अन्वये योजना अनुदानाबाबतीत प्रत्यक्षात: जेवढी अनुदान रक्कम या प्राधिकरणाला मंजूर करण्यात येईल तेवढी रक्कम शासनाच्या मान्यतेमध्ये नमूद करण्यात आलेल्या शर्तीप्रमाणे त्या योजनांवर खर्च करण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"त्यापुढे असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे कार्यकारी समितीला योजना सर्वेक्षणे इ. कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी अंदाजे रु. १० लाखांपेक्षा अधिक देय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा आणि त्या मर्यादेपेक्षा अधिक नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार, अशा प्रकरणांचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटीवर देत आहे."

बाब क्र. १२ : कर्ज मंजुरीसाठी कर्जत कृषि उत्पन्न बाजारपेठ समितीने केलेली विनंती

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ३३२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२चे उप-कलम (१)चा खंड ( ल ) अन्वये प्रयोज्य असलेल्या आणि त्याला या संदर्भात सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीला रु. ५.८० लाख (रुपये पाच लाख ऐंशी हजार फक्त) रकमेचे कर्ज-- या टिप्पणी सोबतच्या जोडपत्र 'अ' मधील सदर नियम व अटींपैकी क्र. २समोरच्या अटीतील दुसऱ्या ओळीमध्ये उल्लेखित "अंत" आणि "सव्याज" या शब्दांमधोमध "वार्षिक हप्त्याने" हे शब्द अंतर्भूत करण्यात येतील. या फेरफारासापेक्ष--सालीना १२ टक्के या व्याजदाराने देण्याच्या प्रस्तावाला याद्वारे आपली मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, या बाबतीत कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाशी योग्य तो करारनामा निष्पादित करावा लागेल.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीला कर्ज वितरण करण्याबाबतीत व समितीशी करारनामा निष्पादित करण्याबाबतीत पुढील उचित कृती करण्यासाठी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

...७/-

बाब क्र.१३ : भू-खंडाच्या अधिमूल्यावरील व्याजास अधित्यजन मिळावे म्हणून कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांनी केलेली विनंती

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि अशा विषयावर यापूर्वी घेण्यात आलेले निर्णय ध्यानात ठेवून कामगार आयुक्त यांनी, त्यांच्याकडून विलंबीत अधिमूल्य भरणा करण्यात आल्याबद्दल देय ठरलेल्या व्याज रकमेवर अधित्यजन मिळावे म्हणून केलेली विनंती मंजूर करता येत नाही, असा निर्णय प्राधिकरणाने दिला. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.333 :

"असा ठराव मंजूर येत आहे की, कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांनी, त्यांना नियत वाटपाने दिलेल्या वांद्रे-कुर्ला समूहातील भू-खंडाप्रीत्यर्थचे अधिमूल्य विलंबाने अदा केल्याबद्दल देय झालेल्या व्याज रकमेला अधित्यजन मिळावे ही विनंती मान्य करता येत नाही हा निर्णय त्यांना कळविण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

बाब क्र.१४ : वांद्रे-कुर्ला समूहातील सी-८ या भू-खंडाचे भारतीय कर्करोग निर्मूलन संस्थेला नियतवाटप : वाढीव परिबध्द जागेची विक्री

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.334 :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुं.म.प्र.वि. प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम 3 चे उपकलम (२) खाली प्राप्त असलेल्या शक्तींचा वापर करुन भारतीय कर्करोग निर्मूलन संस्थेला सुमारे १०८ चौ.मी.या फरकाच्या परिबध्द जागेचे प्रति चौ.मीटरला रु.६०००/- (रुपये सहा हजार फक्त) या अधिमूल्य दराने नियत वाटप करण्याच्या प्रस्तावाला याद्वारे आपली मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, निर्णयाच्या कार्यवाहीसाठी पुढील कृती करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

बाब क्र.१५ : कल्याण समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी असलेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेला प्रस्तुत अधिसूचित क्षेत्राचा (१९८५-८६) सालाचा वार्षिक कार्य-अहवाल

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३३५ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३३ खाली तयार केलेल्या १९८५-८६ सालच्या प्रारुप वार्षिक अहवालास हे प्राधिकरण मान्यता देत आहे व त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, तो अहवाल राज्य शासनास सादर करण्याकरिता महानगर आयुक्तांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१६ : ओशिवरे जिल्हा केंद्रासाठी असलेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेला सदर जिल्हा केंद्राच्या कार्याचा १९८५-८६ सालाचा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३३६ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३३ खालील आवश्यकतेनुसार ओशिवरे जिल्हा केंद्राचे एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने तयार केलेल्या १९८५-८६ या सालातील कार्याच्या वार्षिक अहवालास हे प्राधिकरण आपली मान्यता देत आहे व तो अहवाल पुढील कार्यवाहीसाठी राज्य शासनाकडे अग्रेषित करण्याकरिता महानगर आयुक्तांना याव्दारे प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.१७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी बचत संलग्न गटविमा योजना

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३३७ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुं.म.प्र.वि. प्राधिकरण अधिनियम १९७४ (आजमितीस सुधारीत असल्याप्रमाणे) च्या कलम ५० खाली प्रयोज्य असलेल्या शक्तींआधारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (बचत संलग्न गटविमा योजना) विनियम, १९८७ याना बाब टिप्पणीच्या जोडपत्र-२ मधील विनियमाव्दारे प्रस्तावित केल्याप्रमाणे याव्दारे आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.१८ : प्राधिकरणाच्या वित्त व लेखा विभागातील निरीक्षण उपसंचालक या पदाच्या वेतनश्रेणीत हंगामी सुधारणा करण्याबाबत

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३३८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण मुं.म.प्र.वि.प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे उपकलम (२) खालील प्रयोज्य शक्तींचा वापर करुन बाब टिप्पणीत प्रस्तावित असल्याप्रमाणे कु.प्र.रा.पालेकर या धारण करीत असलेल्या निरीक्षण उपसंचालक या पदाची सध्याची रु.१३००-१८०० ही वेतनश्रेणी दि.१४.२.१९८६ पासून कु.पालेकर या सदर पदावर असतील तोवर रु.२३७५-३५०० अशी त्यांच्यापुरती सुधारीत करुन त्यासोबत केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना देय असल्याप्रमाणे सुधारित दराने घरभाडे भत्ता, शहर पूरक भत्ता, प्रतिनियुक्ती वेतन, महागाई भत्ता आदी लागू करण्यास याव्दारे आपली मान्यता देत आहे."

बाब क्र.१९ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये दुरुस्ती

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३३९ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण, त्याला मुं.म.प्र.वि.प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे उपकलम (२) व अधिनियमाचे कलम ५०--खाली प्रयोज्य शक्तींचा वापर करुन बाब टिप्पणीस जोडलेल्या जोडपत्रात विवेचन असल्याप्रमाणे मुं.म.प्र.वि.प्राधिकरण कर्मचारी (गृहनिर्माण कर्जे) विनियम, १९८१ मध्ये याव्दारे दुरुस्ती करीत आहे."

बाब क्र.२० : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'जी' ब्लॉकमध्ये दूरध्वनी विनिमय केंद्रासाठी रेखांकित १ हेक्टर क्षेत्राच्या भू-खंडाचे अधिमूल्य निर्धारण व दूरध्वनी विभागाला नियत वाटप

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि मार्च, १९८५ मध्ये झालेल्या आपल्या ३५ व्या बैठकीत ठराव क्र.२८६ अन्वये घेतलेला आधीचा निर्णय विखंडीत केला. बाब टिप्पणीत प्रस्तावित असल्याप्रमाणे दूरध्वनी विभागाला नियत वाटपाने द्यावयाच्या भू-खंडाचे अधिमूल्य प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.४,२००/- (रुपये चार हजार दोनशे फक्त) ऐवजी ते प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.५०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतके निर्धारित करण्यात यावे असे प्राधिकरणाने ठरविले. अधिमूल्याच्या रकमेत ... वाढ करण्यासापेक्ष प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३५० :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरण मार्च, १९८५ मध्ये ३५ व्या बैठकीत आयोजित ठराव क्र.२८६ अन्वये घेतलेला निर्णय याव्दारे विखंडित करीत आहे.

त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उप-कलम (२) खाली प्रयोज्य असलेल्या शक्तींचा वापर करुन वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'जी' ब्लॉकमध्ये दूरध्वनी विनिमय केंद्राची स्थापना आणि पूरक सोयींच्या उभारणीसाठी रेखांकित असलेला १ हेक्टर क्षेत्राचा भू-खंड प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला रु.५०००/- या अधिमूल्य दराने भारत सरकारच्या दूरध्वनी विभागाला नियत वाटपाने देण्यास याव्दारे आपली मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, भू-खंडाचा देकार करण्यास आणि भाडेपट्टा करारनाम्याच्या प्र-नमुना आणि भाडेपट्टा विलेख यात आवश्यक तेथे बदल करण्याच्या दृष्टीने पुढील कृती करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.२१ : मुंबईत दूर पल्ल्याच्या प्रवासी रेल गाडयांसाठी प्रस्तावित अंतिम स्थानकांना मान्यता देण्याबाबत

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३४१ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण, बाब टिप्पणीत प्रस्तावित असल्याप्रमाणे, मुंबईत वांद्रे-मार्शलींग यार्ड (बामी) आणि कुर्ला येथे नवीन आंतरशहरीय रेल अंतीम स्थानके स्थापन करण्याच्या प्रस्तावाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कोणतीही हरकत नाही असे रेल्वे प्राधिका-याना कळविण्यास महानगर आयुक्त यांना यान्द्वारे प्राधिकृत करीत आहे."

त्यानंतर, अध्यक्षांच्या अनुमतीने पुढील विषयाच्या टिप्पणीवर पटल बाब म्हणून विचारविमर्श झाला :-

पटल बाब: डोंबिवली व सभोवतालच्या भागासाठी अंतरिम विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम २८ खाली प्राप्त झालेल्या सूचना/हरकतींवर विचारविमर्श करण्यासाठी नियोजन समितीची नियुक्ती

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावावर चर्चा केली आणि पुढील सदस्यांची योजन समिती असावी असा निर्णय घेऊन त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.३४२ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, डोंबिवली व सभोवतालच्या भागासाठीचा प्रारुप अंतरिम विकास आराखडा प्रकाशित झाल्यानंतर त्याला अनुलक्षून जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचारविमर्श करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २८(२) खाली पुढील तीन सदस्यांचा समावेश असलेली एक नियोजन समिती प्राधिकरण यान्द्वारे नियुक्त करीत आहे :

१) महानगर आयुक्त,

२) श्री. चंद्रशेखर प्रभू, विधानसभा सदस्य, आणि

३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुं.म.प्र.वि.प्रा.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, वरील सदस्यांपैकी कुणीही दोन सदस्य बैठकीस उपस्थित असल्यास ती ग्राह्य गणपूर्ती समजण्यात यावी.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, नियोजन समितीने संबंधित अभिवेदकांची बाजू ऐकून घेऊन उक्त अंतरिम विकास आराखडयावरील आपल्या शिफारशी संकल्पित फेरफारांसहीत, तसे ते असल्यास, प्राधिकरणाला विचारविमर्शासाठी सादर करावेत असा आदेश हे प्राधिकरण देत आहे."

अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

---

# MINUTES OF THE FORTY-THIRD MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 23rd March, 1987 (Monday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : Chamber of Hon'ble Minister for Urban Development, 2nd Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Dr. V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - Chairman |
| Shri Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Ramesh Dube, M.L.A. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri S.S. Tinaikar, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri Dinesh Afzulpurkar, Secretary to Government, Housing and Special Assistance Department. | - Member |
| Shri K. Nalinakshan, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri S.N. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

Item No. 1 Confirmation of the minutes of the last (i) 42nd Meeting and the (ii) Special Meeting, held respectively on 9.9.1986 and 26.12.1986.

Minutes of the 42nd meeting held on 9.9.1986 and of the Special Meeting held on 26.12.1986 were confirmed.

Item No. 2 : .....

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (42nd) Meeting and the Special Meeting, held respectively on 9.9.1986 and 26.12.1986.

After discussion, the action taken reports were noted by the Authority.

Item No. 3 : Disposal of Commercial Plots No.C-19 and C-21 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.

The Chairman observed that there are only two plots available for disposal whereas three applicant organisations are to be considered for allotment on priority, viz. (i) Maharashtra State Electricity Board; (ii) Maharashtra Public Service Commission; and (iii) Maharashtra State Co-operative Housing Finance Society. He stated that he would hold a dialogue with the three organisations with a view to exploring the possibility of their sharing the accommodation on the two plots. Pending such dialogue, decision on item was deferred.

Item No. 4 : Disposal of Plot in 'H' Block of the Bandra-Kurla Complex to ONGC.

Consideration of the item was postponed.

Item No. 5 : Allotment of land at Panchpakhadi Tahsil Thane - Request of the BMRDA Employees' Co-operative Housing Society (Proposed).

5.1. It was observed that Government Resolution in Revenue and Forests Department, No.LCS 1083/1885/CR-22/G-4, dated 12.5.1983 has been modified by further Government Resolution issued in 1986.

5.2. At the suggestion of the Chairman, it was decided to refer the matter to a Committee consisting of - (1) the Metropolitan Commissioner; (2) the Secretary, Housing and Special Assistance Department; and (3) the Secretary, Urban Development Department for consideration and report to the Authority. The following Resolution was passed :

RESOLUTION NO.327 :

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (1) of Section 9 of the

BMRDA Act, 1974, the Authority hereby appoints a Committee consisting of the Metropolitan Commissioner as Chairman and the Secretary, Housing and Special Assistance Department; and the Secretary, Urban Development Department as members, to consider the proposal underlying the item in the light of the Government Resolution in Revenue and Forests Department on the subject issued in 1986 and submit its report for Authority's consideration."

Item No. 6 : Transfer of land admeasuring 3.5 Ha. in Wadala area to the Bombay Municipal Corporation for construction of Low-Level Reservoir and Pumping Station at Raoli.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.328 :

"Resolved that in exercise of the powers conferred on it in this behalf, under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the proposal for transfer of an area admeasuring 3.5 Ha. in Wadala-Anik to the Bombay Municipal Corporation for construction of a Reservoir and the Pumping Station on the terms and conditions enumerated in paragraph No.6 of the Agenda Item.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further suitable action for transfer of this plot to the Bombay Municipal Corporation and for indicating the rate of premium for the grant of land.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make suitable changes in the Agreement to Lease and Lease Deed for transfer of the land to the Bombay Municipal Corporation."

Item No. 7 : Channelisation charges in the Bandra-Kurla Complex - Revision thereof.

During the course of discussion on this item it was suggested that although it is necessary to increase the rates of channelisation charges leviable per square metre on the disposable land in the Bandra-Kurla Complex in view of

the increase in the expenditure incurred/to be incurred on that account, it would be desirable to pass on the incidence in such a manner that the major part of increase in the channelisation charges is borne by the commercial users rather than residential users in the Bandra-Kurla Complex. The Authority approved in principle the proposal for increasing the rates of channelisation charges to Rs.300/- per square metre but desired that a detailed proposal for levy of such charges in a graded scale may be brought up for its consideration.

Item No. 8 : Residential accommodation for Staff Members of BMRDA - Purchase of 3 flats at Kurar Village in Borivali Tahsil under Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976.

The Authority considered the Item Note and decided that the flats be purchased in the name of BMRDA and should be utilised as Staff Quarters only. The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.329 :

"Resolved that in exercise of the powers vested in it under Section 3(2) of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves purchase of three flats situated at Kurar Village, Borivali Tahsil on an outright purchase basis at a total cost of Rs.95,850/- (Rupees Ninety five thousand eight hundred fifty only) as detailed in the Item Note."

Item No. 9 : Reservation of Sites under Bombay Urban Development Project (BUDP) for providing alternative accommodation to persons affected by Town Planning Schemes. Proposal of Mayor of Mumbai.

As the Mayor of Mumbai was not present, consideration of the Item was deferred.

Item No.10 : Annual Works Programme for 1987-88.

The Authority considered the Item Note and passed

the .....

the following Resolution :

RESOLUTION NO.330 :

"Resolved that (a) the Annual Works Programme for the year 1987-88 presented with the Item Note is hereby approved and (b) the Executive Committee is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme."

Item No.11 : Annual Budget Estimates for 1987-88.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.331 :

"Resolved that the Annual Budget Estimates for the year 1987-88 and the Revised Estimates for the year 1986-87 showing the estimated receipts and expenditure of the Metropolitan Authority are hereby approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974.

"Resolved further that the Authority do hereby authorise the Metropolitan Commissioner to incur expenditure in respect of Plan Grants to be received from the State Government under Section 18(1)(a) of the Act to the extent of amount released by the State Government as approved and subject to the conditions attached in the sanction of the Government.

"Resolved further that the Authority do hereby authorise the Executive Committee to sanction schemes/ surveys, etc., not included in the Works Programme, estimated to cost not more than Rs.10/- lakhs in each case and to authorise the incurring of any expenditure not exceeding the same limit in respect of which provision has not been made in the approved budget, subject to report of such cases being made to the Authority at the next meeting."

Item No.12 : Request by the Karjat Agricultural Produce Market Committee for grant of loan.

The Authority considered the Item Note and passed

the .....

the following Resolution :

RESOLUTION NO.332 :

"In exercise of the powers conferred by clause (1) of sub-section I) of Section 12 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, the Authority approves the proposal to grant a loan of Rs.5.80 lakhs (Rupees Five lakhs and eighty thousand only) to the Agricultural Produce Market Committee, Karjat @ 12% interest per annum, on the terms and conditions prescribed in Annexure 'A' to the Item Note, subject to the modification that in condition No.(2) words "by annual instalments" be added between the words "five years" and "along with interest".

"Resolved further that the Agricultural Produce Market Committee, Karjat shall execute suitable Agreement with the BMRDA in this respect.

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA is authorised to take further suitable action in respect of disbursement of loan and for executing the Agreement with the Agricultural Produce Market Committee, Karjat."

Item No.13 : Request by the Commissioner of Labour for waiver of interest.

The Authority considered the Item Note and decided that in keeping with the past decisions on such issues the request of the Commissioner of Labour to waive the interest for delayed payment of premium for the plot allotted to it, cannot be granted. The Authority thereafter passed the following Resolution :

RESOLUTION NO.333 :

"Resolved that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to inform the Commissioner of Labour that his request for the waiver of interest on delayed payment of premium amount in respect of plot allotted to him in Bandra-Kurla Complex, cannot be granted."

Item No.14 : .....

Item No.14 : Allotment of Plot No.C-6 to the Indian Cancer Society - Disposal of increased built-up space.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.334 :

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the proposal to allot marginal built-up space admeasuring 106 square metres (approximately) to the Indian Cancer Society at the rate of Rs.6,000/- (Rupees Six thousand only) per square metre.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further suitable action for implementation of the decision."

Item No.15 : Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for Kalyan Complex Notified area for the year 1985-86.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.335 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1985-86 of the BMRDA as Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as required under Section 133 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and further resolved that the Metropolitan Commissioner is authorised to submit the same to the State Government."

Item No.16 : Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for the Oshiware District Centre for the year 1985-86.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.336 :

"Resolved that the Authority hereby approves the Annual Administration Report for the year 1985-86 prepared by BMRDA as a Special Planning Authority for Oshiware

District.....

District Centre, as required under Section 133 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and authorise the Metropolitan Commissioner to forward the same to the State Government for further action."

Item No.17 : Group Savings Linked Insurance Scheme (GSLI) for BMRDA employees.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.337 :

"Resolved that in exercise of its powers under Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 (as amended uptodate), the Authority hereby makes the Bombay Metropolitan Region Development Authority Employees' (Group Savings Linked Insurance) Regulations, 1987, forming Annexure II to the Item Note, as proposed."

Item No.18 : Temporary revision of grade of the post of Deputy Director of Inspection in the Finance and Accounts Division, B.M.R.D.A.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.338 :

"In exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the proposal to temporarily revise the pay-scale of the post of Deputy Director of Inspection from Rs.1300-1800 to Rs.2375-3500 with House Rent Allowance, City Compensatory Allowance, Deputation Pay, Dearness Allowance, etc. at the revised rates as applicable to Central Government employees with effect from 24th February, 1986 till the post is held by Kum. P.R. Jalekar, as proposed in the Item Note."

Item No.19 : BMRDA Employees' (Housing Loans) Regulations, 1981. Amendments to -

The Authority considered the Item Note and passed

the .....

the following Resolution :

RESOLUTION NO.339 :

"Resolved that in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 11 read with Section 50 of the BMRDA Act, 1974 (uptodate), the Authority hereby amends the BMRDA Employees' (Housing Loans) Regulations, 1981, as detailed in the Annexure to the Item Note."

Item No.20 : Disposal of and determination of premium for plot admeasuring 1 Ha. earmarked for Telephone Exchange in 'G' Block of Bandra-Kurla Complex to the Telephone Department.

The Authority considered the Item Note and revoked the decision taken under Resolution No.286 in its 36th Meeting held in the month of March 1985. The Authority considered that the premium for the plot to be allotted to the Telephone Department should be charged at the rate of Rs.5,000/- (Rupees Five thousand only) per F.S.I. square metre instead of Rs.4,200/- (Rupees Four thousand two hundred only) per F.S.I. square metre as suggested in the Item Note. Subject to enhancement of the premium amount, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.340 :

"Resolved that the decision taken by the Authority in its 36th meeting held in the month of March 1985, under Resolution No.286, is hereby revoked.

"Resolved further that in exercise of the powers conferred on it in this behalf under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby approves the proposal for allotment of plot admeasuring 1 Ha. in 'G' Block of Bandra-Kurla Complex earmarked for Telephone Exchange to the Telephone Department, Government of India for establishment of Telephone Exchange and other allied facilities at the rate of Rs.5,000/- (Rupees Five thousand only) per F.S.I. square metre.

"Resolved further that the Metropolitan Commissioner, BMRDA is hereby authorised to take further action for making offers and for effecting suitable

changes.....

changes in the Form of Lease and Lease Deed wherever necessary."

Item No.21 : Proposed Long-Distance Rail Passenger Terminal(s) at Bombay. Approvals to -

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.341 :

"Resolved that the Authority hereby authorises the Metropolitan Commissioner to convey to the Railway Autorities concerned N.O.C. of the BMRDA to the seting-up of new Inter-city Rail Terminals at Bandra-Marshalling Yard (BAMY) and Kurla as proposed in the Item Note."

The following Item was then considered as Table Item, with the permission of the Chairman :

Table Item : Draft Interim Development Plan for Dombivali and surrounding areas - Appointment of Planning Committee under Section 28 of the MR&TP Act, 1966 to consider the suggestions/objections received.

The Authority discussed the proposal contained in the Item Note and decided that the Planning Committee should consist of the Metropolitan Commissioner; Shri Chandrashekhar Prabhu; and the Chief, Town and Country Planning Division, BMRDA, and accordingly, passed the following Resolution :

RESOLUTION NO.342 :

"Resolved that in partial modification of previous orders passed in the matter, the Authority hereby appoints a Planning Committee consisting of the following Members :

(1) Metropolitan Commissioner;
(2) Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A.; and
(3) Chief, Town and Country Planning Division, BMRDA.

to consider the suggestions/objections under Section 28(2) of the MR&TP Act, 1966 received in response to the

application.....

application of the said draft Interim Development Plan for Dombivali and surrounding areas;

"Further resolved that any two of the above Members shall constitute a valid quorum;

"Further resolved that the Planning Committee should after hearing the persons concerned submit their recommendations along with the proposed modifications, if any, to the said Interim Development Plan to the Authority for consideration."

The Meeting terminated with a vote of thanks to the Chair.

$$$$$$$$$$$$$$$$$$$$$$$

ukd:1487: